संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आनंद अनुभूतीची पर्वणी

**वसंत** ऋतूच्या आगमनाबरोबर येणारा चैत्र पाडवा म्हणजे सृष्टीच्या सान्निध्यातला एक अवर्णनीय आनंदाचा संधीकाल ठरतो. भारतीय कालगणनेची ही सुरुवात निसर्गाच्या स्थित्यंतराचा अचूक अंदाज घेऊन केली गेली आहे, असेही सहजपणे ध्यानात येते. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने ज्या वसंत ऋतूचा उच्चार 'कुसुमाकर' म्हणून केला आहे आणि सगळ्या ऋतूंमध्ये आपल्याला हा ऋतू अधिक आवडतो, असेदेखील मोठ्या गौरवाने म्हटले आहे. त्याच कुसुमाकर ऋतूच्या मंदगंधाच्या सुगंधाने नव्या कोवळ्या पालवीच्या मोहराने वातावरण भारावलेले असते. उन्हाचा तडाखा काहीसा वाढत असतानाच झाडांवरची ही कोवळी हिरवी पाने डोळ्यापेक्षाही मनाला अधिक सुखद वाटत असतात. कडूनिंबाची तीच कोवळी पाने घरी आणून गुढीच्या शिरपेचात खोवली जातात. रांगोळ्यांनी सजवलेल्या अंगणात आणि नव्या वस्त्राचा पेहराव घेऊन उभारली जाणारी गुढी कालचक्राच्या गुढतेला नवसंकल्पांचे आवाहन करीत असते. भारतीय संस्कृतीची ही कालरचना केवळ भूत आणि भविष्याचे वर्तमान सांगणारी नाही, तर सृष्टीच्या सृजनाचे आणि मानवी अंतर्मनाचे अनुबंध व्यक्त करणारी एक सुंदर शृंखला असल्याचे आपल्या लक्षात येते. सृष्टीच्या या विलोभनीय स्थित्यंतराचे चित्रीकरण कुठेतरी मनुष्याच्या चित्ताशी जाऊन जोडले असावे म्हणूनच हा चैत्र वर्षाचा सुरुवात करणारा महिना ठरला असावा. भगवान श्रीकृष्णाने ज्याला कुसुमाकर म्हटले आहे, त्या कुसुम या शब्दातच फुलांचा कोवळेपणा आणि त्यातला मन मोहरणारा सुगंध गृहीतपणे समोर येतो. आकर्षून घेणारी ही कुसुमाकरातली कोवळी पाने म्हणजे जणू सृष्टीच्या विनयशीलतेचा एक अनुपम सोहळाच वाटू लागतो. सृष्टीकडून दिली जाणारी सगळी अनुपमतेची अनंत स्वरुपाची देणगी मनुष्याने तितक्याच आनंदाने अनुभवावी, तिचा आदर करावा हादेखील या गुढीमागचा गूढ अर्थ तर नाही ना, असे काही वेळेला वाटते. सृष्टीच्या या परिवर्तनाला काळाने घातलेली ही तितकीच नम्र प्रदक्षिणाच म्हटली पाहिजे. निमित्ताला औचित्याचे कोंदण प्राप्त करून आनंदाची अनुभूती देणारी ही व्यवस्था म्हणूनच हजारो वर्षांपासून टिकून राहिली. कदाचित सृष्टीचे हे गूढ समजून घेण्यासाठीच भारताच्या ऋषीमुनींनी, तपस्व्यांनी सणवारांचे परिपाठ घालून दिलेले दिसतात. ते समजून घेतानाच प्राप्त होणारे समाधान आणि आनंद वेगळा अनुभव देतात. खरे तर नेहमीप्रमाणे उगवणारा हा दिवस तोच सूर्योदय, तीच पहाट आणि तीच सकाळ घेऊन येतो तरीदेखील साडेतीन मुहूर्तांचा एक अलंकार बहाल केलेला हा सण आनंदाचे एक नवे उधाण प्राप्त करून देतो.

### संवेदनांशी असलेला मेळ

केवळ कालगणनेची सुरुवात म्हणून पाडव्याचे महत्त्व असते, तर तेही समाजाला एवढे भावले नसते. परंतु या रचनेमध्ये निसर्ग आणि मानवी मनाचा घेतलेला वेध हा अधिक समृध्द करणारा ठरतो. आपल्याच घराच्या अंगणात आपणच गुढी उभारायची आणि आपल्या घराला आपल्याच हाताने तोरण बांधून आनंद मानून घ्यायचा, इतका सोपेपणा त्यामध्ये नाही. परंतु, हे करताना आपल्या बरोबरीने इतरांनाही आनंद होणार आहे. अशा एका मनाच्या सहज स्वभावाची प्रचिती येत असते. पाडव्याला प्रभू रामचंद्रांचा वनवास संपला, ते अयोध्येत परतले. म्हणून तिथल्या नगरजनांनी गुढ्या, तोरणे उभारून आनंदोत्सव साजरा केला. या घटनेला आज हजारो वर्षे होऊन गेली किंवा अशाच हजारो वर्षांपूर्वी आपल्या शौर्यातून साम्राज्य विस्तार करणाऱ्या शालिवाहन राजाने स्वतःच्या नावाने शालिवाहन शक सुरू केले. या सगळ्यांचे आजच्या काळातले औचित्य काय तर हीच भारतीय संस्कृतीची खासियत आहे. त्याच्या जीवनक्रमामध्ये इतिहासातल्या या कालखुणा भावी पिढीसाठी प्रोत्साहन देणाऱ्या चिरंतन पाऊलखुणा असतात. हे सातत्याने संस्कारांच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न या संस्कृतीने केला आणि म्हणूनच तो खरे सुख आणि खरा आनंद याचे मर्म ओळखू शकला. जगातल्या अनेक संस्कृती लयाला गेल्या. कारण त्यांना हा भेद सांगता आला नाही. किंबहुना कालखुणांना ते पाऊल खुणांमध्ये परावर्तित करू शकले नाही. भौतिक सुखाच्या वावटळीत अनेक कालखुणा पुसल्या गेल्या आणि त्यांच्या संस्कृतीही नष्ट झाल्या. भारताच्या प्राचीन संस्कृतीने ही परंपरा जपली. आणि म्हणून इथला समाजही एका आत्मविश्वासाचे आंदण घेऊन सतत आनंदी राहू शकला. या दिवशी दिल्या जाणाऱ्या सदिच्छा आणि शुभेच्छा हा केवळ दोन शब्दांचा खेळ नसतो. तर त्यातल्या संवेदनांशी घातलेला मेळ असतो.

### सृष्टी आणि मनाचा संबंध

आजच्या वेगवान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये गुढ्या, तोरणे, रांगोळ्या याची आवश्यकता तपासण्याचा मोह अनेकांना होतो. परंतु, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मिळणारे भौतिक सुख खऱ्या आनंदाची अनुभूती देऊ शकत नाही, ही खंत सतत मनामध्ये राहते. त्यातूनच याच तंत्रज्ञानाचा वापर करून पाडव्यापासून दिवाळीपर्यंत आनंदप्राप्तीचा तो प्रयत्न करीत राहतो. आजच्या युगात प्रगती, विकास या गोष्टी अनिवार्य आहेत. परंतु, जिथे जिथे सृष्टीचा आणि मनाचा संबंध येतो, तिथे तिथे प्रगतीपेक्षाही आत्मोन्नती आणि विकास नव्हे तर अंतिम सत्याचा ध्यास या गोष्टीच महत्त्वाच्या ठरतात. अयोध्येत परतलेला राम अभिजनांच्या आनंदाचा भाग ठरतो, तर याच साडेतीन मुहूर्तांच्या प्रभातसमयी शुभसंकल्पांचा आधार घेऊन स्वतःमधला आत्माराम जागवण्याची संधी का सोडावी, असे वाटले तर ते अयोग्य ठरणार नाही. सृष्टीने सांगितलेले सत्य आपल्या संकल्पासाठी उपयोगात आणावे, यासाठीच या मुहूर्तांचे महत्त्व लक्षात येते. पाडव्याचे हे पावित्र्य आजच्या आधुनिक युगातही आपले तितकेच महत्त्व राखून आहे. सृष्टी आणि काळापुढे व्यक्त झालेली ही विनयशीलता एका संपन्नतेचे आश्वासन देणारी असते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारतीय संस्कृतीने सांगितलेली ही विद्या विनयाचाच आग्रह धरते, हेही यानिमित्ताने सहज लक्षात येते. या दिवशी सोनपावलांनी येणारी सोनेरी किरणे सृष्टी आणि सौंदर्याचे एका अर्थी अभिवादनच असते.